# दलित वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी

दलित वस्ती सुधारणा योजना १ एप्रिल १९९९ पासुन अमलात आली आहे. दलित वस्ती सुधारणा योजनेचा एक भाग म्हणुन ग्रामिण व शहरी भागांमधील दलित वस्त्यांमधील अनुसुचित जातीच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी शासन स्तरावरुन ५ लक्ष रुपये अनुदान देण्यात येते. ५० ते १०० लोकसंख्या असलेल्या दलित वस्तीला २ लक्ष रुपये व १५० लोकसंख्या असलेल्या दलित वस्तीला ५ लक्ष रुपये शासना कडुन मंजुर करण्यात येते.

या योजने अंतर्गत जोड रस्ते बांधकाम, गटार बांधकाम, पाणी पुरवठयाच्या सोयी, विहिर दुरुस्ती, विज पुरवठा व समाजमंदीर बांधकाम, इत्यादी बांधकामे घेण्यात येतात. दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येणारे बांधकाम ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात येते.

विभागीय समाज कल्याण अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे दलित वस्ती सुधारणेचा कामावर प्रत्येक्ष नियंत्रण राहते. समाज मंदीर बांधकामाचा पेटर्न स्थानिक परिस्थिती व गरज लक्षात घेवुन ग्राम पंचायती मार्फत ठरविले जाते. समाज मंदीराचे नमुने व नकाशे पचायत समितीचे कनिष्ठ अभियंता यांचा वतीने तयार केले जातात. समाज मंदीरात वाचनालयासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते.

समाज मंदीराव्यतिरिक्त इतर कामे उदाहर्णाथ नाला बांधकाम, रस्ते, पाणी पुरवठा इत्यादि कामे रुपये ५.०० लक्ष यामर्यादेत आवश्यकतेप्रमाणे घेण्यात येतात. वाचनालय सांभळण्यासाठी गावातील गरजु, अपंग, मागासवर्गीय व्यक्तीश रुपये ३००/- दरमाह मानधानावर ग्रामपंचायतीने काम पाहण्यास सांगण्यात येते. ग्रंथालय विभागाची मान्यता मिळेपर्यंत ग्रामपंचायतीच्या वतीने आपल्या २०% उत्पन्नातुन वाचनालयाचा खर्च करण्यात येतो.